# म. गांधी यांचा शिक्षण विषयक दृष्टिकोन

**प्रा. नंदा नामदेव मोळे**

स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे. ता. करवीर जि. कोल्हापूर. मोबाईल नंबर 9423272754

**प्रस्तावना :–** भारताच्या स्वातंत्र्य लढयात परकीय सत्तेशी लढत असताना आमच्या अनेक नेत्यांनी नवभारत कसा असावा याचा विचार केलेला होता. 19 व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीय समाजसुधारकांनी शिक्षणामार्फत जनजागृतीला प्रारंभ केला होता. जोपर्यंत राष्ट्राच्या गरजेनुसार शिक्षणाचा आपण उपयोग करत नाही तोपर्यंत भारताची आपण पारतंत्र्यातून मुक्तता करु शकणार नाही. अशी खुणगाठ भारतीय समाजसुधारकांनी मनाशी बांधली होती. त्याचवेळी 1920 साली भारतीय राजकारणाच्या पटलावर महात्मा गांधींनी पदार्पण करुन असहकारीतेची चळवळ सुरु केली. इंग्रजी शासनामार्फत व इंग्रजी शासनाच्या अनुदानाने चालविल्या जाणा–या शाळा–महाविद्यालयांवर बहिष्कार टाकण्यास त्यांनी विद्यार्थ्यांना उद्युक्त केले. याबरोबरच शैक्षणिक विचार प्रखरतेने मांडण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यांनी जे काही विचार मांडले यातून त्यांना नवभारताच्या पूनर्रचनेची असलेली तळमळ, भारतीय बांधवांविषयी असलेला जिव्हाळा प्रस्तूत निबंधातून आपल्याला पाहता येईल. त्याचबरोबर गांधीजींचे शैक्षणिक विचार हे आजच्या काळातील समाजव्यवस्थेला आदर्श ठरतात म्हणून त्यांच्या शिक्षण विषयक असणा–या दृष्टिकोनाची चिकित्सक मांडणी प्रस्तुत शोधनिबंधात केली आहे.

**शोधनिबंधाची उद्धिष्टे :–**

1) शिक्षणाच्या माध्यमातून बदलत्या समाजाचे चित्रण करणे.
2) महात्मा गांधींच्या शैक्षणिक विचारांचा समाजावर झालेला परिणाम अधोरेखित करणे.
3) महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार व कार्याचा अभ्यास करणे.
4) आजच्या शिक्षणपद्धतीवर महात्मा गांधीजींच्या शैक्षणिक विचारांचा झालेल्या परिणामांचा परामर्श घेणे.
5) शिक्षणातून स्वभाषा, स्वधर्म, स्वसमाज व स्वदेशाच्या उन्नतीची तळमळ अधोरेखित करणे.
6) शिक्षणातून विद्यार्थ्यामध्ये लोकशाही दृष्टिकोन निर्माण करणे.

**गृहीतके :–**

1) देशाची आर्थिक, सामाजिक परिस्थिती विचारात घेऊन अभिनव शिक्षण योजना समजून घेणे.
2) गांधीजींच्या विचारातून स्वावलंबन आणि स्वयंपूर्णता हा शिक्षणाचा खरा अर्थ समजून घेणे.
3) भारतीय अर्थविकासाच्या दृष्टिने शिक्षणाच्या माध्यमातून बदलते संदर्भ लक्षात घेणे.
4) शिक्षणाच्या माध्यमातून लोकांच्या जीवनान्ध्ये सत्य, अहिंसा आणि प्रेम रुजविणे.

महात्मा गांधी जीवनाचा समग्रपणे विचार करणारे तत्वचिंतक होते. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. व्यक्तिच्या जीवनाला जर नवी दिशा दयायची असेल तर शिक्षणाकडे अगदी बारकाईने लक्ष दिले पाहिजे. हा शिक्षणविषयक विचार गांधीजींना पटला होता. भारतीय जनतेला स्वाभिमानाने जगवायला शिकविणारे, त्यांना माणूस बनविणारे, त्यांच्या पोटाला उद्योग देणारे शिक्षण गांधीजींना अभिप्रेत होते. म्हणूनच गांधीजी म्हणतात की,' शिक्षण हे काही साध्य नव्हे ते एक साधन आहे.' ज्या शिक्षणाने आपण चारित्र्यवान बनू तेच खरे शिक्षण मानता येईल.

**गांधीजींच्या मते शिक्षणाची व्याख्या :–** "केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, शिक्षणाचा प्रारंभ देखील नव्हे, आत्मा व मन यांचा परिपूर्ण विकास करुन व्यक्तिमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय होय."

शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी. मातृभाषेमुळे विद्यार्थ्यास अध्ययनातील श्रवण, भाषण, वाचन, लेखन आणि मनन या किया सोप्या वाटतात. याच कियांमधून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा विकास घडून येतो. त्यामुळे शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी असा विचार महात्मा गांधी यांचा होता.

महात्मा गांधीजींनी प्राथमिक शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण, प्रौढ शिक्षण, महिलांचे शिक्षण,व्यवसायाधिष्ठीत शिक्षण अशा वेगवेगळया पातळयांवर शिक्षणाचा विचार केला आहे. प्राथनिक शिक्षण हे मोफत आणि सक्तीचे असावे. ते मातृभाषेतून देण्यात यावे. या शिक्षणपध्दतीत सूतकताई, विणकाम, शेती पुस्तक बांधणी, मातीकाम, हस्तकला, बागकाम यासारख्या कृतीयुक्त उपकमांचा समावेश केला होता. या बरोबरच गणित आणि समाजशास्त्राच्या बरोबरीनं चित्रकला आणि संगीत या विषयांनाही अभ्यासकमात महत्वाचे स्थान दिले होते.

गांधीजींना शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करावयाचा होता. म्हणून महाविद्यालयीन शिक्षण विविध उद्योगांशी जोडलेलं असावं. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च उद्योगांनी करावा परंतू त्यावर सरकारचं नियंत्रण असावं. या विद्यापीठातील शिक्षणातून लोकसेवक निर्माण व्हावे हा उद्देश गांधीजींचा होता. आपल्या देशातील असंख्य लोक निरक्षर आहेत. अज्ञान, अंधश्रध्दा, व्यावहारिक ज्ञानाचा अभाव यामुळे खेडयातील सावकार त्याला फसवितो व त्याच्या श्रमाचा गैरफायदा घेतो. त्यामुळे या सर्व गोष्टीतून त्यांची मुक्तता व्हावी, यासाठी गांधीजींनी प्रौढशिक्षणास उत्तेजन दिले

गांधीजींची शिक्षण पध्दती ही विद्यार्थी केंद्रीत शिक्षण पध्दती होती. विद्यार्थ्यांच्या आवडी–निवडी, कल, अभिरुची लक्ष्यात घेऊन शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकविणे अपेक्षित होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांला पाठयपुस्तकाबाहेर जाऊन शिक्षण दिले पाहिजे. कारण आजचे

विद्यार्थी हे उद्याचे भावी नागरीक आहेत. तसेच शाळेमध्ये शारीरिक शिक्षण सक्तीचे केले पाहिजे या गोष्टीवर गांधीजींनी विशेष भर दिला होता. प्राणायम व आसने यासारखा व्यायाम विद्यार्थ्यांनी केला पाहिजे यासाठी गांधीजी आग्रही होते.

धार्मिक शिक्षणाविषयीची एक विशेष दृष्टी गांधीजींच्याकडे होती. जाती–धर्मात निर्माण होण–या संघर्षाला दूर केल्याशिवाय ख–या अर्थाने राष्ट्रात ऐक्य नांदणार नाही याची कल्पना त्यांना होती. धार्मिक शिक्षणाची व्यवस्था करणे त्यांना मान्य नव्हते मात्र विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक सहिष्णुवृत्ती वाढविण्यासाठी व शाश्वत नीतीमूल्यांबददल आदर निर्माण व्हावा म्हणून सर्व धर्माच्या शिकवणुकीचा शिक्षणात अंतर्भाव करावा असे ते म्हणत.

गांधीजी स्त्रीशिक्षणावर ही अधिक भर देताना दिसतात. कारण कोणत्याही कुटुंबातील एखादा पुरुष शिकला तर तो केवळ स्वतः पुरताच शिकला. पण जर कुटूंबातील एक स्त्री शिकली तर सर्व कुटूंबच शिकल्यासारखे आहे. ही गोष्ट त्यांना पटली होती. गांधीजींना शिक्षणातून एक आदर्श स्त्री निर्माण करावयाची होती. याबाबतीत श्रीमती प्रेमलीला ठाकरसी म्हणतात, ''गांधीजींनी स्वयंपाकघराच्या कोंडवाडयातून आम्हाला बाहेर आणले. आम्हाला स्वाभिमानाची त्यांनी शिकवण दिली. शूर व निर्भय बनविले.'' अशाप्रकारे गांधीजींनी शिक्षणव्यवस्थेत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिले.

गांधीजींनी सत्य, अहिंसा व प्रेम या नुल्यांच्या प्रचितीसाठी अनेक प्रयोग केले. तसेच विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या प्रयोगातून त्यांनी काही मुलगामी सिध्दांत मांडले. आफ्रिकेत व भारतात निरनिराळया परिस्थितीशी झगडत असताना त्यांनी काही शैक्षणिक प्रयोगही केले. हे प्रयोग त्यांनी दक्षिण आफ्रिकेत फिनिक्स आश्रम, टॉलस्टॉय फार्म आणि भारतात परतल्यानंतर शांतिनिकेतन, कोचरब आश्रम आणि साबरमती आश्रम या ठिकाणी केले. असे शैक्षणिक प्रयोग करीत असताना त्यांच्या शैक्षणिक विचारांना जी परिपक्वता आली यातूनच त्यांनी पुढे वर्धा शिक्षण परिषद बोलावून 1937 मध्ये राष्ट्रव्यापी शैक्षणिक पुनर्रचनेची वर्धा योजना राष्ट्राला सादर केली.

**वर्धा शिक्षण योजना :–** समाजक्रांतीचे नवसमाज निर्मितीचे व व्यक्तिमत्व विकासाचे साधन म्हणून गांधीजी शिक्षणाकडे पहात होते. भारत हा खेडयांचा देश असल्यामुळे शेती व शेतीशी संबंधीत अन्य व्यवसाय यावरच भारतीय जीवनाची अर्थरचना अवलंबून होती. परंतु प्रचलित शिक्षण पध्दती, खेडयातील मूलोद्योग, हस्त व्यवसाय याकडे अजिबात लक्ष देत नव्हती. शिक्षण व जीवन यांचा जर जवळचा संपर्क नसेल तर ते शिक्षण केवळ वरवरची शोभा होईल. म्हणून जीवन, शिक्षण व संस्कृती यांचा एकात्मतेने विचार करणारी एक नवीन धारा गांधीजींनी भारताला वर्धा शिक्षण योजनेच्या रुपाने दिली. म्हणूनच वर्धा शिक्षण परिषदेत नेमल्या गेलेल्या समितीसमोर गांधीजी आत्मविश्वासपूर्ण शब्दात म्हणाले की, ''मैने हिंदूस्थानको आजतक जो बहूतसी चीजें दी है, उन सबसें शिक्षाकी यह योजना और पध्दती सबसे बडी चीज है और मैं नही मानता की इससे ज्यादा अच्छी कोई चीज मैं देशको दे सकूंगा।''

गांधीजींनी दिनांक 22 व 23 ऑक्टोबर 1937 रोजी वर्धा येथे भरलेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय परिषदेसमोर वर्धा शिक्षण योजनेची मांडणी केली. या परिषदेने डॉ. झाकीर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली या शिक्षण योजनेचा अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी एक समिति नेमली. सनितीने 2 डिसेंबर 1937 रोजी आपला अहवाल सादर केला. व्यक्तिला आपल्या कार्यक्षमतेची जाणीव करुन देण्याच्या उददेशाने मांडलेल्या या शिक्षण योजनेच्या अहवालामध्ये एकूण चार प्रमुख कलमे सांगण्यात आली.

1) सात ते चौदा वर्षे वयापर्यंतच्या मुलामुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे, सार्वत्रिक व मोफत असावे.
2) शिक्षणाचे माध्यम विद्यार्थ्यांची मातृभाषा असावी.
3) शिक्षण कोणत्यातरी एका उत्पादक उदयोगाच्या व्दारे देण्यात यावे.
4) शिक्षण स्वाश्रयी असावे. म्हणजेच निवडलेल्या उत्पादक उदयोगातून शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सुटावा.

ही योजना मूलोद्योगी शिक्षण योजना, बुनियादी शिक्षण, नयी तालिम, जीवन शिक्षण या नावानेही ओळखली जाते. ही शिक्षण योजना म्हणजे महात्माजींच्या सुंदर स्वप्नापैकी एक सर्वात नोठे स्वप्न होते. गांधीजी म्हणत 'मी आतापर्यंत हिंदुस्थानाला अनेक देणग्या दिल्या आहेत. त्या सर्वात माझी शिक्षण योजना ही मोठी देणगी आहे. नला वाटत नाही की याहून मोठी देणगी नी देऊ शकेन.' गांधीजी असेही म्हणत की या योजनेमुळे संपूर्ण गाव समृध्द बनेल कोणतीही व्यक्ती अशिक्षित, बेकार राहणार नाही. प्रत्येकजन कोणत्या ना कोणत्या उदयोगात रमलेला असेल. गांधीजींना हा विश्वास आपल्या शिक्षण पध्दतीमुळे आला होता.

**समारोप :–** महात्मा गांधीजींच्या शिक्षण विषयक असणा–या दृष्टिकोनाविषयी विवेचन करताना असे लक्षात येते की, गांधीजींच्या शिक्षण पध्दतीत आदर्शवाद, निसर्गवाद आणि कार्यवाद यांचा सुंदर मिलाफ झालेला आपल्याला दिसून येतो. त्यांनी आपल्या शिक्षण पध्दती मध्ये जे काही शैक्षणिक प्रयोग केले त्यावरुन असे वाटते की, विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व कौशल्यावर अधारित शिक्षण पध्दती यावर त्यांनी अधिक भर दिलेला दिसून येतो. यावरुन आज गांधीजींच्या शैक्षणिक विचारांची बीजे संपूर्ण देशभर पसरविण्याची गरज आहे. आजच्या आधुनिक युगात त्यांनी मांडलेले मुलभूत शिक्षण, कौशल्यावर आधारित शिक्षण धोरण हे उपयुक्त आहे. म्हणूनच नविन शिक्षण प्रणालीची धोरणे आखताना गांधाजींचे तेव्हाचे विचार नक्कीच उपयुक्त आहेत. असे याठिकाणी मला ननूद करावेसे वाटते.

## निष्कर्ष :–

1) महात्मा गांधींनी देशाची आर्थिक, सामाजिक परिस्थिती विचारात घेऊन अभिनव शिक्षण योजना राबविल्याची दिसून येते.
2) गांधीजींची शिक्षण पध्दती ही व्यवसायाभिमुख व कृतीयुक्त असल्याची दिसून येते.
3) गांधीजींच्या शैक्षणिक विचारातून स्वावलंबन आणि स्वयंपूर्णता हा शिक्षणचा खरा अर्थ लक्षात येतो.
4) गांधीजींची शिक्षण पध्दती ही विद्यार्थीकेंद्रित असून विद्यार्थ्याचे हित जोपसणारी असल्याची दिसून येते.

5) आजच्या काळात ही शिक्षणपध्दती वेगवेगळ्या क्षेत्रात जोर धरु लागल्याचे दिसते.

6) गांधीजींनी शिक्षणयोजनेत उदयोगाला महत्वाचे स्थान दिल्याने विद्यार्थी क्रियाशील बनला व स्वतः क्रिया करता–करता शिकू लागल्याचे दिसते.

7) गांधीजींची शिक्षणपध्दती ही भारतीय संस्कृतीला स्वावलंबी, सज्ञानी व सक्षम बनविणारी होती.

**संदर्भ ग्रंथ :–**

1) प्राचार्य रा. तु. भगत–'महात्मा जोतीराव ते कर्मवीर भाऊराव' चैतन्य प्रकाशन कोल्हापूर,प्रथमावृत्ती 1जानेवारी 1994.

2) ग. वि. अकोलकर– 'गांधीजींचे शिक्षण विषयक विचार' चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती 1971.

3) दा. न. शिखरे– गांधी गौरव ग्रंथ, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे.

4) नलिनी पंडित– गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती 2 ऑक्टोबर 1983.

5) डॉ. सदानंद मोरे– 'लोकमान्य ते महात्मा' राजहंस प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती 2007.

6) किशोर बेडकीहाळ– 'परिवर्तन विचार : चिंतन आणि चिकित्सा– वसंत पळशीकर यांचे निवडक लेख. लोकवाड्मय प्रकाशन प्रथमावृत्ती 2013.